


आके पॉवर हाऊसबाहेर अनधिकृत गाडे तसेच पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



भारत-विरुद्ध ब्रूक: मैदानावरील वाद कायम पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २४ जून २०२५ I पाने ४ I ₹ ४ I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 292 I Verna, I facebook.com/dainikherald I Tuesday 24 June 2025 I Pages 4 I ₹ 4

## निवडक

### इराणवरील एअर स्ट्राईकनंतर अमेरिकेच्या लष्करी तळावर मोठा हल्ला

**तेहरान, दि.२३:** इराण-इस्रायल युद्धात अमेरिकेनं उडी घेतल्यानं तणाव वाढला आहे. अमेरिकेनं इराणमधील तीन अण्वस्त्र तळांवर एअर स्ट्राईक केला. जमिनीखाली असलेले तळ उद्ध्वस्त करण्याच्या हेतूनं बी-२ बॉम्बर विमानांनी बंकर बस्टर बॉम्ब टाकले. जमिनीखाली असलेले तळ उद्ध्वस्त करण्यासाठी त्यांचा वापर होतो. यानंतर आता अमेरिकेच्या सैन्य तळावर मोठा हल्ला झाला आहे. सीरियातील अमेरिकेचे तळ लक्ष्य करण्यात आले आहेत. इराणमधील अमेरिकेच्या हल्ल्याला ३६ तास उलटल्यानंतर अमेरिकन तळावर हल्ला झालेला आहे.

अमेरिकेच्या तळावरील हल्ला इराणनं केला असल्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्याभरापासून इराण-इस्रायल यांच्यात संघर्ष पेटलेला आहे. दोन्ही देश एकमेकांवर हवाई हल्ले चढवत आहेत. या युद्धात अमेरिका इस्रायलच्या बाजूनं उतरला आहे. अमेरिकेनं २२ जूनला इराणच्या तीन ठिकाणांवर एअर स्ट्राईक केला. ऑपरेशन मिडनाईट हॅमरच्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. त्यानंतर आता सीरियाच्या पश्चिम हसाका प्रांतात असलेल्या अमेरिकेच्या लष्करी तळावर हल्ला झालेला आहे. अद्याप तरी या हल्ल्याची जबाबदारी कोणीही घेतलेली नाही. अमेरिकेनं युद्धात उडी घेतल्यास मध्य पूर्व आशियातील त्यांच्या सैनिकी तळांवर हल्ले करु, अशी थेट धमकी इराणनं आधीच दिलेली होती. त्यामुळे हा हल्ला इराणनंच केलेला असण्याची शक्यता आहे.

### अमेरिकेने इराणवर हल्ला केला तरी बुशहर प्रकल्पाला धक्काही लावला नाही!

**नवी दिल्ली, दि. २३ :** अमेरिकेने इराणच्या तीन अणुऊर्जा स्थळांवर हल्ले केल्यानंतर काही तासांतच इराणमधील बुशहर या बंदरावर स्फोट झाले. इस्रायल डिफेन्स फोर्सेसने दिलेल्या माहितीनुसार, बुशहरमध्ये हल्ला करण्यात आला आणि इराणमधील इस्फहान, अहवाझ आणि बुशहर शहरांमधील क्षेपणास्त्र लाँचर्सवरही निशाणा साधण्यात आला. बुशहरमध्ये इराणचा एकमेव अणुऊर्जा प्रकल्प आहे. मात्र या प्रकल्पात इराणी अधिकाऱ्यांनी कोणतीही समस्या नोंदवली नाही.

बुशहर हे इराणमधील एकमेव कार्यरत अणुऊर्जा केंद्र आहे आणि ते रशियाने बांधले आहे. रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, आखाती किनाऱ्यावर असलेल्या बुशहरमध्ये रशियन इंधन वापरले जाते आणि त्यानंतर झाल्यावर ते रशियाला परत पाठवले जाते, जेणेकरून अणु प्रसारणाचा धोका कमी होईल.

### युद्धजन्य स्थितीमुळे भारतातील एलपीजी पुरवठा कोलमडणार?

**नवी दिल्ली, दि. २३ :** पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थितीचा थेट परिणाम आता तुमच्या स्वयंपाकघरावर पडणार आहे. कारण भारतातील घरगुती एलपीजी सिलिंडरच्या पुरवठ्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. देशात सुमारे दोन-तृतीयांश एलपीजी सिलिंडरचा पुरवठा पश्चिम आशियातून होतो. अमेरिकेने इराणच्या अणुऊर्जा केंद्रावर हल्ला केल्याने तेल उत्पादन प्रभावित होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे एलपीजी पुरवठ्यावर परिणाम झाल्यास घरगुती वापरातील इंधनाच्या वापरावर मर्यादा येऊ शकते, असे उद्योग अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

गेल्या दशकभरात भारतात एलपीजीचा वापर जवळजवळ दुप्पट झाला आहे. एलपीजी सिलेंडर हा स्वयंपाकघरातील आवश्यक गरज ठरत आहे. ३३० दशलक्ष घरांपर्यंत सिलेंडर पोहोचला असून एलपीजी वापरकर्त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पण आयात-निर्यात धोरणाकडे पाहता समजते की, भारताची आयातीवरील निर्भरता वाढली आहे, कारण सुमारे ६६ टक्के एलपीजी हा विदेशातून आयात केला जातो, ज्यापैकी ९५ टक्के पश्चिम आशियातून, मुख्यतः सौदी अरेबिया, यूएई आणि कतारमधून आयात होतो.

# कळंगुटसह परिसरातील ओडीपी योजना रद्द !

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २३ : कळंगुट, कांदोळी , पर्रा, हडपीड आणि नागवे या पाच गावांमधील वादग्रस्त आराखडा विकास योजना (ओडीपी ) मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने रद्दबादल ठरवल्या आहेत . याबाबत १५ डिसेंबर २०२२ रोजी जारी करण्यात आलेले परिपत्रक आणि २२ ऑगस्ट २०२४ चा कार्यकारी आदेशही न्यायालयाने रद्द केला आहे.उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले की, या पाच गावांमधील कोणतेही विकास परवाने आता प्रादेशिक योजना २०२१ च्या अधीन राहूनच दिले जावेत.**

नगर नियोजन विभागाच्या (टीसीपी ) विनंतीवर सुनावणी करताना, न्यायालयाने चार आठवड्यांची स्थगिती दिली असून तोपर्यंत जैसे थे स्थिती राखण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विभागाने सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याची तयारी दर्शवली आहे.

या निर्णयामागे गोवा फाउंडेशन, कळंगुट ग्रामपंचायत आणि कळंगुट मतदारसंघ मंच या संस्थांनी दाखल केलेल्या जनहित याचिका कारणीभूत ठरल्या. यापूर्वी २३ जानेवारी २०२५ रोजी न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने अंतरिम आदेश देत, संबंधित गावांतील कोणताही भूवापर बदल किंवा बांधकाम होऊ नये, असे स्पष्ट निर्देश दिले होते.

तथापि, राज्य सरकारने या आदेशाविरोधात विशेष परवानगी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. मात्र, ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने ती फेटाळून लावत उच्च न्यायालयाच्या भूमिकेची पाठराखण केली.सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनी गोवा सरकारचे वकीलांना उद्देशून सांगितले होते की, कृपया गोव्याला काँक्रीटच्या जंगलात रूपांतरित करू नका

या निर्णयाबाबत प्रतिक्रिया देताना, कळंगुट मतदारसंघ मंचाचे अध्यक्ष प्रेमानंद दियुकर म्हणाले की, हमें अद्याप



## उच्च न्यायालयाचा आदेश

न्यायालयाचा संपूर्ण आदेश मिळालेला नाही. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, एनजीपीडीए आणि टीसीपी विभाग ओडीपी अंतर्गत दिलेल्या मंजुरीनुसार कोणतेही बांधकाम पुढे राबवू शकत नाहीत. अनेक प्रकल्प आधीच सुरु आहेत, त्यांच्या भवितव्याबाबत आदेश वाचल्यावरच स्पष्टता येईल.

कळंगुटचे सरपंच जोसेफ सिक्वेरा यांनी सांगितले की, आदेशाची प्रत प्राप्त झाल्यावरच आम्ही अधिकृत प्रतिक्रिया देऊ. सध्या सुमारे पाच-सहा प्रकल्प या आदेशांमुळे प्रभावित होण्याची शक्यता आहे.

कळंगुट विधानसभा क्षेत्रातील वरील गावांमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यावरणस्नेही डोंगर उतार, हिरवळीचे पट्टे व जैवविविधतेने नटलेली भूमी वसाहतींसाठी आरक्षित करून उच्च ' एफएआर ' मंजूर करण्यात आला होता. यामुळे नागरी आणि स्थानिक संस्था ओडीपींना तीव्र विरोध करत होत्या.

हा निर्णय केवळ स्थानिक ग्रामस्थच नव्हे तर पर्यावरण रक्षणासाठी कार्यरत संस्थांसाठीही एक मोठा विजय मानला जात आहे.

### ओडीपी वादाचा इतिहास

- **२०१६ : कळंगुट ग्रामपंचायतीने एनजीपीडीएमधील समावेशाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ही याचिका २०१७ मध्ये मागे घेतली.**
- **२०२२ : नव्या पंचायत मंडळाच्या निवडीनंतर पुन्हा नवीन याचिका दाखल करण्यात आली. गोवा फाउंडेशनने स्वतंत्र जनहित याचिकाही दाखल केली.**
- **१५ डिसेंबर २०२२ : राज्य सरकारने पाचही गावे नियोजन क्षेत्र म्हणून अधिसूचित करत नवीन ओडीपी जारी केला.**
- **२२ डिसेंबर २०२२ : सरकारने परिपत्रक जारी करत टीसीपी विभागाला मागे घेतलेल्या ओडीपीच्या आधारे परवाने द्यावेत असे निर्देश दिले.**
- **१४ डिसेंबर २०२४: उच्च न्यायालयाने या परिपत्रकाला स्थगिती दिली.**
- **२८ फेब्रुवारी २०२४ : सरकारने टीसीपी कायद्यातील कलम १९(३) अंतर्भूत करणारा अध्यादेश जारी करून स्थगिती आदेश निष्प्रभ करण्याचा प्रयत्न केला.**
- **मे २०२४ : उच्च न्यायालयाने दोन्ही ओडीपींना पुन्हा स्थगिती दिली.**
- **जून २०२५ : अखेर न्यायालयाने दोन्ही आराखडे रद्द ठरवत स्पष्ट निर्णय दिला.**

# आदिवासी निधी त्वरित वाटप करण्याची 'आप'ची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २३ :** गोवा राज्यातील अनुसूचित जमाती (एसटी) समुदायाच्या विकासासाठी राखीव असलेल्या निधीचे अद्याप वितरण झाले नसल्याबद्दल आम आदमी पक्षाच्या (आप) गोवा युनिटने राज्य सरकारवर तीव्र टीका केली आहे. पक्षाने प्रलंबित आदिवासी कल्याण निधीचा तात्काळ वापर करण्याची आणि संबंधित योजनांची वेळेत अंमलबजावणी करण्याची मागणी केली.

पत्रकार परिषदेत बोलताना आपचे प्रदेशाध्यक्ष ॲड. अमित पालेकर यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आदिवासी समुदायासाठी राखीव असलेल्या निधीपैकी सरकारने आजपर्यंत १० टक्केही वितरित केलेले नाही. आदिवासी उप-योजना (टीएसपी ) आणि इतर कल्याणकारी योजनांचा निधी वर्षानुवर्षे प्रशासकीय प्रक्रियेत अडकून पडलेला आहे, तर दुसरीकडे आदिवासी समुदाय अजूनही गरीबी, बेरोजगारी, आरोग्यसेवेचा अभाव, शिक्षण आणि घरटंची कमतरता या गंभीर समस्यांचा सामना करत आहे, असे त्यांनी सांगितले.

ॲड. पालेकर यांच्या माहितीनुसार, आदिवासी उप-योजनेसाठी १०.२३ टक्के राखीव बजेट असूनही चालू आर्थिक वर्षात केवळ ४ टक्केच म्हणजे सुमारे १,२०० कोटी रुपयांचे वाटप झाले आहे. त्याच वेळी, अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या ३०० कोटी रुपयांहून अधिक निधीचा अद्याप वापर झालेला नाही, हे त्यांनी अधोरेखित केले.

आप'ने राज्य सरकारकडे मागणी केली आहे की, अनुसूचित क्षेत्रे अधिकृतपणे अधिसूचित करावीत, वनहक्क कायद्यांतर्गत प्रलंबित दाव्यांचे निवारण त्वरीत करावे आणि आदिवासी तरुणांना शिक्षण, कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

भाजप सरकारवर टीका करताना, ॲड. पालेकर म्हणाले, राज्यातील आदिवासी कल्याण विभाग आणि गोवा राज्य अनुसूचित जमाती आयोग हे दोन्ही यंत्रणा निष्क्रिय आणि भ्रष्ट असल्याचे आरोप माजी आदिवासी मंत्री गोविंद गावडे यांनीही यापूर्वीच मांडले आहेत. त्यांनी सरकारकडून आदिवासी समाजाला वारंवार दिल्या जाणाऱ्या आश्वासनांचा फोलपणा उघड केला.

आप'च्या म्हणण्यानुसार, राज्यात आतापर्यंत १० हजारांहून हून अधिक वनहक्क दावे दाखल झाले असून, त्यापैकी ८,५०० प्रकरणे अजूनही प्रलंबित आहेत. लोकसभा निवडणुकीदरम्यान मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मार्च २०२४ पर्यंत सर्व दावे निकाली काढण्याचे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप त्या दिशेने कोणतीच ठोस कृती दिसत नाही,अशी टीका पालेकर यांनी केली.

आपच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी ते विधानसभेत आणि रस्त्यावरही संघर्ष सुरू ठेवणार आहेत. आमचे आदिवासी बांधव हे केवळ घोषणांसाठी नाहीत, त्यांच्या हक्कांसाठी आम्ही निर्णायक आवाज उठवत राहू, असे पालेकर यांनी ठामपणे सांगितले.

# पणजी मार्केटच्या गळक्या छताची दुरुस्ती १५ जुलैपर्यंत ?

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २३ :** पावसाळ्यात विक्रेत्यांचे मोठे नुकसान करणाऱ्या पणजी नगरपालिका बाजारपेठेच्या गळणाऱ्या छताची अखेर दुरुस्ती होणार आहे. पणजी महानगरपालिका २ जुलै रोजी या कामासाठी निविदा उघडणार असून, संबंधित दुरुस्ती काम १५ जुलैपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती सीसीपीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

या आठवड्यात निविदेची जाहिरात प्रसिद्ध होणार असून, बाजारपेठेतील सुमारे ४० पत्र्यांचे छत नव्याने बसवले जाणार आहे. सध्या बाजारपेठेची अवस्था अत्यंत दयनीय असून, पावसामुळे छतांमधून होणाऱ्या गळतीमुळे विक्रेत्यांचे आणि ग्राहकांचे दोघांचेही हाल सुरू आहेत.

पणजी मार्केट शॉप ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजन दमास्कर यांनी या निर्णयाचे स्वागत केले असले तरी ते म्हणाले की, ही सकारात्मक बातमी आहे. मात्र कामाची गुणवत्ता आणि त्याची अंमलबजावणी यावर आमचा पुढील प्रतिसाद अवलंबून असेल. त्यांनी स्पष्ट केले की, छतावरील गळतीमुळे विक्रेत्यांना विशेषतः नाशवंत वस्तू विकणाऱ्यांना ( फळे, भाजीपाला विक्रेते ) मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागले आहे.

छतावरील अनेक पत्रे गेल्या काही वर्षांपासून गहाळ होती आणि तात्पुरत्या पॅचवर्कमुळे विक्रेत्यांना सतत मुसळधार पावसाचा सामना करावा लागत होता. परिणामी, बाजारात विक्रेते त्यांच्या स्टॉलवर ताडपत्री टाकून माल वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत.यंदाच्या पावसाळ्याच्या प्रारंभीच जोरदार वाऱ्यांसह पडलेल्या पावसामुळे बाजारातील जवळपास ४० पत्रे उडून गेले होते . पाणी थेट दुकानांमध्ये शिरल्याने विक्रेत्यांचे उत्पादन खराब झाले आणि विक्रीवर थेट परिणाम झाला. ओली फळे ग्राहक घेत नाहीत त्यामुळे आर्थिक नुकसान हे आम्हा विक्रेत्यांचे रोजचे वास्तव बनले आहे, असे एका फळविक्रेत्याने सांगितले.

बाजारपेठेतील सद्यस्थितीमुळे स्मार्ट सिटी' या घोषणेला छेद जात असल्याची टीका होत आहे. गळती लागलेले छप्पर , अस्वच्छ सार्वजनिक शौचालये, साचलेले पाणी आणि पायऱ्यांवरून वाहणारे गटारांचे पाणी या साऱ्या समस्या आजही ग्राहक आणि विक्रेत्यांना त्रास देत आहेत.

विक्रीयोग्य वातावरण तयार करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना विक्रेत्यांमध्ये आहे. नागरिकांच्या आणि व्यापाऱ्यांच्या सातत्याने होणाऱ्या तक्रारींना अखेर प्रतिसाद देत पणजी महानगरपालिकेने ही दुरुस्ती हाती घेतली आहे. मात्र, या कामाचे वेळेत आणि दर्जाने पूर्ण होणे हेच यशाचे खरे मोजमाप ठरणार आहे.

२ जुलै रोजी निविदा प्रक्रिया उघडल्यानंतर संबंधित काम तत्काळ सुरू होईल आणि १५ जुलैपर्यंत सर्व छतपत्रे बसवण्याचे लक्ष्य आहे. पावसाळा संपण्यापूर्वी बाजारपेठ सुरक्षित आणि सुसज्ज बनवणे ही आता सीसीपीसमोरील प्राथमिक जबाबदारी ठरणार आहे.

# इस्रायल-इराण युद्ध अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे आणखी भडकण्याची शक्यता

**▶ इराणच्या भूमिगत अणुउत्पादन केंद्रांवर अमेरिकेकडून प्रचंड शक्तिशाली बंकर-बस्टर बॉम्बचा वापर**

**दोहा/तेहरान, दि. २३ :**



इस्रायल-इराण संघर्षात अमेरिकेच्या थेट हस्तक्षेपामुळे संपूर्ण मध्यपूर्वेत युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. कतारमधील अमेरिकेच्या अल उदेद हवाई तळावर इराणकडून संभाव्य हल्ल्याची माहिती मिळाल्यानंतर दोहामध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आले आणि हवाई क्षेत्र काही काळासाठी बंद करण्यात आलं. अमेरिकन दूतावासाने नागरिकांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान, अमेरिकेने इराणच्या भूमिगत अणुउत्पादन केंद्रांवर प्रचंड शक्तिशाली बंकर-बस्टर बॉम्बचा वापर करत मोठे हवाई हल्ले केले. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशानुसार फोर्दो, नतांझ आणि इस्फहान येथील केंद्रांवर १३,६०० किलोग्रॅमचा 'मॅसिव्ह ऑर्डनन्स पेनिट्रेटर' बॉम्ब टाकण्यात आला. हे केंद्र पूर्णपणे नष्ट झाल्याचा दावा ट्रम्प यांनी केला असून, इराणने प्रत्युत्तर दिल्यास अधिक तीव्र हल्ला करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या पार्श्वभूमीवर इराणने अमेरिकेच्या आखातातील लष्करी तळांना लक्ष्य करण्याची चेतावणी दिली असून, त्यांची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रं बहारीन, कतार, सौदी अरेबिया, यूएई आणि इतर ठिकाणी पोहोचू शकतात. अमेरिका पश्चात्ताप करेल, असा इशारा देत इराणी रिव्होल्यूशनरी गार्ड्सनी संभाव्य लक्ष्यांची यादी प्रसिद्ध केली आहे.

युद्धाचा प्रसार होण्याची भीती वाढली आहे. इस्रायलनेही सोमवारी तेहरानमधील एका तुरुंगावर हल्ला करत राजकीय कैद्यांना लक्ष्य केलं, ज्यामुळे इराणच्या सत्ताधाऱ्यांवरील दबाव वाढला आहे.

पान २ ▶

# खंडणी प्रकरणातील मोस्ट वॉन्टेड टोळीचा पर्दाफाश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २३ :** गोवा पोलिसांनी खंडणी मागण्याच्या प्रकरणात मोठे यश मिळवत मोस्ट वॉन्टेड टोळीचा पर्दाफाश केला आहे. गोवा आणि कर्नाटकमध्ये संयुक्तपणे राबवलेल्या कारवाईनंतर पाच आरोपींना अटक करण्यात आली असून, यात टोळीचा प्रमुख टार्झन पार्सेकर याचा समावेश आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पार्सेकरला पेडणे भागात नाट्यमय पाठलागानंतर अटक करण्यात आली. त्याच्यासोबत अटक करण्यात आलेल्यांमध्ये नागोआ येथील सागर पाटील आणि शिवोली येथील सानिश घटवाळ यांचा समावेश आहे. हे दोघे रेईश मागूस येथील एका बांधकाम व्यावसायिकाकडून खंडणी वसूल केल्याच्या प्रकरणात वाँटेड होते. सलमान खान आणि मकसूद खान या इतर दोन आरोपींना साखळी भागात स्वतंत्र खंडणीप्रकरणात अटक करण्यात आली. ही अटक २१ जून २०२५ रोजी डिचोली परिसरात करण्यात आली होती.

पोलिसांनी स्पष्ट केले की, पार्सेकर आणि पाटील हे दोघेही गेल्या वर्षभरापासून फरार होते. अटक टाळण्यासाठी ते काही काळ नेपाळमध्येही लपले होते. पार्सेकरविरोधात एकूण नऊ गुन्हे दाखल आहेत, तर पाटील तीन गंभीर गुन्ह्यांत सहभागी आहे.

९ जून २०२५ रोजी रेईश मागूस येथील रहिवासी अविनाश सिंदे यांनी पर्वरी पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे ही कारवाई सुरू झाली. ८ जून रोजी, पिलर्ण मधील सावले तलावाजवळ त्यांच्या घरी परतत असताना पार्सेकर, पाटील आणि त्यांच्या एका अज्ञात साथीदाराने शिंदे यांना अडवले होते. त्यांनी शिवीगाळ करत, दरमहा १ लाख रुपये खंडणी देण्याचा दबाव टाकला आणि न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली होती. यापूर्वीही या टोळीने त्यांच्याकडून मारहाणीच्या धमक्यांद्वारे पैसे वसूल केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पर्वरी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत कलम १२६(२), ३०८(५), ३५१, ३५२ आणि कलम ३(५) नुसार एफआयआर दाखल केला.मार्च २०२४ मध्ये गोवा येथील मुंबई उच्च

पान २ ▶